आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१५ जून २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- जी सेवन परिषदेत भावी पिढीसाठी उत्तम जगाची निर्मिती करण्यासाठी सर्वांनी वचनबद्धता दर्शवल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- इतर लहान-मोठे पक्ष आणि संघटनांसह विधानसभा निवडणूक अधिक ताकदीनं लढवण्याची महाविकास आघाडीची घोषणा
- साहित्य अकादमीचा बाल साहित्य पुरस्कार भारत सासणे आणि युवा पुरस्कार देविदास सौदागर यांना जाहीर
- उन्हाळी सुट्टीनंतर आज राज्य शिक्षण मंडळाच्या शाळा पुन्हा सुरू, विविध उपक्रमांनी विद्यार्थ्यांचं स्वागत

  **आणि**

- १८ व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं उद्घाटन, सुब्बय्या नल्लमुत्थू यांना व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार जाहीर

**<><><><><>**

जी सेवन परिषदेत जागतिक समुदायाला लाभदायक ठरतील अशा प्रभावी उपाययोजना आखण्यासह भावी पिढीसाठी एका उत्तम जगाची निर्मिती करण्यासाठी सर्वांनी वचनबद्धता दर्शवली, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. इटलीचा दौरा आटोपून नवी दिल्लीला परतल्यानंतर हा दौरा अतिशय फलदायी झाल्याचं त्यांनी समाज माध्यमवरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. या दौऱ्यात जागतिक नेत्यांशी विविध विषयांवर चर्चा झाली, असं त्यांनी सांगितलं.

या परिषदेनिमित्त जमलेल्या इतर राष्ट्रप्रमुखांशी प्रधानमंत्र्यांनी या दौऱ्यात चर्चा केली. इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी, जपानचे प्रधानमंत्री फुमिओ किशिदा यांच्याबरोबरच संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अँतोनिओ गुटेरस यांचीही मोदी यांनी भेट घेतली.

**<><><><><>**

महाविकास आघाडी म्हणून आम्ही तीन पक्ष आणि इतर काही सामाजिक संघटनांसह छोटे पक्ष मिळून आगामी विधानसभा निवडणूक एकत्रित आणि अधिक ताकदीने लढणार असल्याची घोषणा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज जाहीर केले. धार्मिक ध्रुवीकरणाचा निवडणुकीत काहीही परिणाम झाला नाही, अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी दिली.

महाविकास आघाडीनं आज मुंबईत संयुक्त परिषद देऊन लोकसभा निवडणुकीत ४८ पैकी ३० जागा निवडून दिल्याबद्दल राज्यातल्या मतदारांचे आभार मानले आहेत. मदत करणारे छोटे-मोठे पक्ष, काही संघटना आणि सामाजिक कार्यकर्ते यांचेही त्यांनी आभार मानले आहेत.

दरम्यान काँग्रेस, उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्यात श्रेयवादाची लढाई सुरु झाली आहे. प्रत्येक पक्ष मुख्यमंत्रीपदावर दावा करत आहे. यावरुन मविआची बांधिलकीही जनतेच्या प्रश्नांशी नसून सत्तेच्या खुर्चीसाठी असल्याची टीका शिवसेना सचिव माजी आमदार किरण पावसकर यांनी केली आहे.

**<><><><><>**

राज्यसरकार सर्वच जाती धर्माच्या लोकांच्या विकासासाठी वचनबद्ध असल्याचं शिवसेनेचे नेते डॉ. राजू वाघमारे यांनी म्हटलं आहे. राज्य सरकारनं वक्फ मंडळाला दिलेल्या निधीवरून होत असलेल्या टीकेबद्दल त्यांनी आज मुंबईत बातमीदारांशी संवाद साधला.

<><><><><>

लोकसभेप्रमाणे विधान परिषदेच्या निवडणुकीतही महाविकास आघाडीचाच विजय होईल असा विश्वास महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष आणि कोकण पदवीधर मतदार संघाच्या समन्वय समितीचे अध्यक्ष नसीम खान यांनी व्यक्त केला आहे. नसीम खान यांनी आज मुंबईत टिळक भवन इथं, विधान परिषदेच्या कोकण पदवीधर मतदारसंघातले महाविकास आघाडीचे उमेदवार रमेश कीर इथं पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली त्यावेळी ते बोलत होते.

<><><><><>

राज्य विधानपरिषदेच्या मुंबई शिक्षक, मुंबई पदवीधर तसंच कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी मतदानाच्या वेळेत वाढ करण्यात आली आहे. यानुसार आधी सकाळी ८ ते संध्याकाळी ४ ही वेळ बदलून सकाळी ७ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत केली गेली आहे. या सर्व जागांसाठी येत्या बुधवारी २६ जून २०२४ रोजी मतदान होणार आहे.

<><><><><>

साहित्य अकादमीचे २०२४ या वर्षासाठीचे बाल साहित्य पुरस्कार तसंच युवा पुरस्कार आज जाहीर झाले. मराठीत भारत सासणे यांच्या 'समशेर आणि भूत बंगला' या कादंबरीला बालसाहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे. तर युवा पुरस्कारात तुळजापूर इथले साहित्यिक देविदास सौदागर लिखित 'उसवण' या

कादंबरीची निवड करण्यात आली आहे. पन्नास हजार रुपये आणि सन्मानचिन्ह असं दोन्ही पुरस्काराचं स्वरूप असून, पुरस्कार वितरणाची तारीख लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचं, साहित्य अकादमीनं जाहीर केलं आहे.

**<><><><><>**

उन्हाळी सुट्टीनंतर आज पुन्हा एकदा राज्य शिक्षण मंडळाच्या शाळा मुलांच्या किलबिलाटाने भरून गेल्या. शाळेच्या पहिल्या दिवशी विविध शाळांमध्ये मोठ्या उत्साहात विद्यार्थ्यांचं स्वागत करण्यात आलं.

**मुंबईत** वरळी इथल्या महानगरपालिकेच्या शाळेत महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी गुलाब पुष्प देऊन विद्यार्थ्यांचं स्वागत केलं आणि त्यांच्याशी संवाद साधला. 'विद्यार्थी प्रवेश पाडवा' आणि 'पहिले पाऊल' या उपक्रमांचा प्रारंभही त्यांच्या हस्ते झाला. **पुण्यातल्या** न्यू इंग्लिश मीडियम शाळेत मोबाईलचा अतिवापर करणार नाही, निकृष्ट अन्न खाणार नाही, प्लास्टिक साहित्याचा वापर टाळू, नियमित व्यायाम करू, मैदानी खेळ खेळू, शुभंकरोती म्हणू अशी प्रतिज्ञा करीत पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी वासुदेवाच्या झोळीत दान टाकलं.

**लातूर** शहराजवळ वरवंटी इथल्या शाळेत विद्यार्थ्यांची बैलगाडीतून मिरवणूक काढण्यात आली. इयत्ता पहिली मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आलं. **जालना** शहरासह जिल्ह्यातल्या ग्रामीण भागातल्या शाळांमध्ये आज पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियानांतर्गत पाठ्यपुस्तकांचं वाटप करण्यात आलं.

**रत्नागिरी** मधल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मुलांची प्रभातफेरी काढण्यात आली. त्यानंतर औक्षण करून, फुलं आणि लाडू देऊन मुलांचं स्वागत

करण्यात आलं. तर **हिंगोली** मध्ये विद्यार्थ्यांना पुस्तकांचं वाटप करण्यात आलं. **सांगली** जिल्ह्यात पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी महानगरपालिकेच्या शाळेतल्या मुलांच गुलाबपुष्प आणि रोप देऊन स्वागत केलं. **धुळे** शहर आणि जिल्ह्यात शैक्षणिक वर्षाची सुरुवात विद्यार्थ्यांचं स्वागत आणि पाठ्यपुस्तकाच्या वितरणानं उत्साहात झाली.

**<><><><><>**

मुंबईहून कोल्हापूरला जाणाऱ्या कोयना एक्स्प्रेसखाली सापडून तीन महिलांचा मृत्यू झाल्याची दुर्घटना काल रात्री कोल्हापुरात घडली. याप्रकरणी शाहूपुरी पोलीस अधिक तपास करत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक अजय सिंदकर यांनी दिली.

**<><><><><>**

१८व्या 'मिफ' अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात दिला जाणारा व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार विख्यात वन्यजीव चित्रपट निर्माते सुब्बय्या नल्लमुत्थू यांना दिला जाणार असल्याची घोषणा माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी आज केली. चित्रपटांमुळे मनोरंजन तर होतंच, शिवाय आर्थिक वाढीला चालना मिळते आणि रोजगाराच्या संधीही उपलब्ध होतात, असं ते म्हणाले. भारतीय चित्रपटक्षेत्राच्या वाढीसाठी सरकार वचनबद्ध आहे. माहितीपट, लघुपट, ॲनिमेशनपट निर्मात्यांनी भारतात येऊन चित्रीकरण करावं, असं आवाहन त्यांनी केलं.

'मिफ'चं औपचारिक उद्घाटन मुंबईत डॉ. एल. मुरुगन, राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, महोत्सवाचे संचालक पृथुल कुमार आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत झालं. अभिनेता रणदीप हुडा, अभिनेत्री दिव्या दत्ता,

पार्श्वगायक कैलाश खेर आणि इतर यावेळी उपस्थित होते. पुण्याच्या भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेला आणि प्रतिष्ठेच्या कान चित्रपट महोत्सवात यंदा ला सिनेफ पुरस्कार पटकवणारा 'Sunflowers Were The First Ones To Know' हा लघुपटही आज दाखवण्यात आला. त्यापूर्वी बिली अँड मॉली- ॲन ऑटर लव्ह स्टोरी हा उद्घाटनाचा चित्रपट दाखवण्यात आला. २१ जूनपर्यंत चालणाऱ्या या महोत्सवात एकंदर ३१४ चित्रपट दाखवण्यात येणार आहेत.

**<><><><><>**

राज्यात कोणत्याही बी- बियाणांची चढ्या भावानं विक्री किंवा बोगस बियाण्यांची विक्री आणि लिंकिंग सारखे अपराध करणाऱ्या कृषी निविष्ठा दुकानदारांवर यापुढे कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिला आहे. मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातले सर्व विभागीय आयुक्त, कृषी आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, कृषी अधिकारी यांची आढावा बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. प्रत्येक जिल्ह्यात आता एक ऐवजी अतिरिक्त तीन भरारी पथकं नेमावीत तसंच या भरारी पथकांनी दररोज कमीत कमी २५ दुकानांवर धडक भेटी देऊन तपासण्या कराव्यात, कोणताही गैरप्रकार आढळल्यास जागच्या जागीच गुन्हा दाखल करून परवाना निलंबनाची कारवाई करावी, असे निर्देश त्यांनी दिले आहेत. प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांनी जून अखेर पर्यंत पीक कर्जाचं उद्दिष्ट ७५ टक्के मर्यादेत पूर्ण करण्याच्या सूचना मुंडे यांनी दिल्या.

**<><><><><>**

आयसीसी टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारत आणि कॅनडा संघांमध्ये सामना होणार आहे. हा सामना फ्लोरिडा इथल्या सेंट्रल ब्रॉवर्ड पार्क मैदानावर भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री आठ वाजता सुरू होईल.

<><><><><>

भौतिकशास्त्र विषयाच्या डॉक्टरेट पातळीवरच्या  विद्यार्थ्यांच्या संख्येत लिंगसमतोल साधण्यासाठी मुंबईत विज्ञान-विदुषी हा उपक्रम आजपासून सुरु झाला. मुंबईतलं होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र आणि टाटा मूलभूत संशोधन संस्था यांनी हा तीन आठवड्यांचा निवासी उपक्रम आयोजित केला आहे. यासाठी ईशान्य भारतासह देशभरातून आलेल्या ५०० अर्जांमधून ४५ विद्यार्थिनींची निवड करण्यात आली आहे.

<><><><><>

छत्तीसगडच्या बस्तर परिसरात सुरक्षा दलांबरोबरच्या चकमकीत आज ८ माओवादी मारले गेले, तरविशेष कृती दलाचा एक जवान शहीद झाला. अबुझमाडच्या जंगलात माओवादी सक्रीय असल्याची खबर मिळाल्यावरुन ITBP, जिल्हा राखीव पोलीस आणि विशेष कृती दलाच्या संयुक्त पथकानं शोधमोहिम सुरु केली होती. त्यादरम्यान ही चकमक झाली.  माओवाद्यांनी केलेल्या गोळीबारात सुरक्षा दलाचा एक जवान शहीद झाला तर एक जवान जखमी झाला असून त्याच्या जिवाचा धोका  आता टळला असल्याचं वृत्त आहे. ठार झालेल्या माओवाद्यांचे मृतदेह, दोन रायफली, BGL लाँचर, आणि इतर शस्त्र आणि दारुगोळा सुरक्षा दलांनी ताब्यात घेतला आहे.

<><><><><>

नैऋत्य मोसमी पाऊस चार ते पाच दिवसांत राज्याच्या आणखी काही भागात दाखल होण्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे. गेल्या चोवीस तासात कोकण आणि मराठवाड्यात मुसळधार पाऊस पडला. विदर्भात बऱ्याच ठिकाणी तर मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात कोकण बऱ्याच ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातही पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**